ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 58.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख २८ डिसेंबर, १९६० अंक ४७

## विविध माहिती

**इंग्लंडच्या राणीसाठी खास गाडी**— इंग्लंडची राणी एलिझाबेथ पुढील महिन्यांत भारतांत येणार आहे. राणीच्या भारतामधील मुक्कामांत वापरण्यासाठीं भारत सरकारनें एक खास मोटारगाडी जर्मनीहून मागविली आहे. ती नुकतीच मुंबई बंदरांत आली आहे. ही गाडी मुद्दाम बांधविण्यांत आली असून ती आरामशीर व खात्रीची व्हावी म्हणून खास दक्षता घेण्यांत आली आहे. गाडी मर्सिडिझ-बेंझ कारखान्याने तयार केलेली आहे.

**तेलाच्या शोधासाठी इटलीची मदत**— इटालिअन सरकारच्या मालकीच्या तेल कंपनीचा प्रमुख अधिकारी भारतांत येऊन गेला. भारतांत खनिज तेलाचा शोध लावण्याच्या कामीं मदत देण्याची तयारी इटलीनें दाखविली आहे. इटालियन कंपनी अशुद्ध तेलाच्या उत्पादनांत होणाऱ्या नफ्यापैकी ५० टक्के नफा देण्यास तयार आहे. त्याचप्रमाणें संशोधनाच्या कामीं ५० टक्के भांडवल घालण्याची तयारीहि तिनें दाखविली आहे.

**अहमदाबाद कॉर्पोरेशनचें अंदाजपत्रक**— अहमदाबाद कॉर्पोरेशनचें १९६१-६२ सालचें अंदाजपत्रक तयार झालें आहे. हें अंदाजपत्रक शिलकीचें असून त्यांत कोठलाहि नवा कर सुचविण्यांत आलेला नाहीं. उत्पन्नाच्या बाजूला ४·९७ कोटी रुपये दाखविण्यांत आले असून खर्चाच्या बाजूला ४·९५ कोटी रुपये दाखविण्यांत आले आहेत. उत्पन्नाच्या बाजूला कॉर्पोरेशनच्या गौळवाड्याचे ५० लाख रुपये दिसून येतात.

**मिश्र पोलादाचें उत्पादन**—मंगलोर येथील कॅनरा वर्कशॉप ह्या कारखान्यानें मिश्र पोलादाचें उत्पादन करणारा एक कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ६० लाख रुपये भांडवल लागेल. १९६२ च्या अखेरीस कारखान्यांत उत्पादनास प्रारंभ होईल. सुरुवातीला दरमहा ८०० टन पोलाद निर्माण करण्यांत येईल. पण नंतर उत्पादन ३,००० टनांपर्यंत वाढवितां येईल.

**राज्य सरकारांना असलेलीं कर्जें**—मध्यवर्ती सरकार राज्य सरकारांना निरनिराळ्या विकासाच्या कामासाठी कर्जें देत असतें. १९५९-६० अखेर राज्य सरकारांकडून मध्यवर्ती सरकारला येणें असलेल्या कर्जाची एकूण रक्कम रु. १,६७६ कोटी आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ही रक्कम रु. १,९०५ कोटी होईल असा अंदाज आहे. सध्यां राज्य सरकारें दरसाल १०० कोटी रुपयांची फेड करतात. तिसऱ्या योजनेच्या अखेरीस १५० कोटी रुपयांची फेड होऊं लागेल.

**काजूच्या लागवडीखालील जमीन**—१९५८-५९ सालीं रत्नागिरी तालुक्यांत काजूच्या लागवडीखालीं ५,११४ एकर जमीन होती, १९५९-६० सालीं ह्या लागवडीखालील जमीन १५,१९४ एकरांनीं वाढली आहे. जिल्ह्यांतील काजूच्या उत्पादकांना मदत म्हणून राज्य सरकारनें रु. १,८४,३११ ची रक्कम कर्जाऊ दिलेली आहे.

**उसाच्या चिपाडापासून कागद**—उसाच्या चिपाडापासून कागद तयार करण्याचा एक कारखाना महाराष्ट्रांत स्थापन करण्यास मध्यवर्ती सरकारनें मान्यता दिली आहे, अशी माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. कारखान्याच्या उभारणीस १० कोटी रुपये भांडवल लागेल. महाराष्ट्रांतील साखर-कारखान्यांपासून उसाचीं चिपाडें भरपूर प्रमाणांत मिळतील अशी अपेक्षा आहे.

**साखरेला परदेशी बाजारपेठ**—भारताचे अन्नमंत्री श्री. एस. के. पाटील ह्यांनीं भारतामधून ५ लाख टन साखर अमेरिकेला निर्यात करण्याचा प्रयत्न केला जाईल असें जाहीर केलें होतें. परंतु ही साखर अमेरिकेंत चढाओढीच्या दरांत विकली जाणें सहज साधणार नाहीं, अशी भीति माहितगारांकडून व्यक्त करण्यांत येत आहे.

**सिलोनचें तेल कॉर्पोरेशन**—सिलोनच्या सरकारनें तेल कॉर्पोरेशन स्थापन करण्यासाठी एक बिल आपल्या पार्लमेंटमध्यें मांडलें आहे. त्याचें भांडवल १ कोटी रुपये अथवा ७ लाख, ५० हजार पौंड आहे. कॉर्पोरेशनला विस्तृत अधिकार देण्यांत आले असून त्यांत तेलाची आयात, निर्यात, विक्री अगर वांटप करण्याचेहि अधिकार आहेत. तेलाच्या पुरवठ्याची परदेशी कंपन्यांची मक्तेदारी मोडण्याचा हा प्रयत्न आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## पुणें सहकारी विद्यालय, पुणें १

### २६ वा शिक्षणवर्ग

### सप्टेंबर १९६० मध्यें झालेल्या को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षेंत पास झालेल्या विद्यार्थ्यांचीं नांवें

**दुसरा वर्ग :** आर. एस. गदगे, डी. डी. अनासपुरे, आर. व्ही. जोशी, जी. आर. नाझीरकर, आर. बी. पानसरे, ए. एच. सैय्यद, एस. एल. शेळके.

**तिसरा वर्ग :** एस. जी. आपटे, जे. जी. कात्रे, के. व्ही. ओझरकर, एन. के. अनगरे, बी. एस. भरणे, एस. आर. भोसले, एस. टी. देव, एच. एम. एरंडे, एस. एम. गायकवाड, ए. पी. जाधव, ए. जी. जगताप, एस. बी. जगताप, एस. टी. जोशी, एस. बी. कड, जी. डी. कानडे, बी. एम. कुलकर्णी, डी. एल. कुंभार, एम. यू. मकानदार, एम. एस. माने, व्ही. पी. नेमाडे, आर. बी. पाटणकर, के. ए. पाटील, एम. टी. पाटील, एस. डी. पाटील, जे. व्ही. पवार, टी. एम. पवार, के. के. पेटकर, आर. जे. शिंदे, एस. के. शिंदे, एम. आर. ताजणे, के. पी. उंद्रा, एम. एल. जगताप, व्ही. आर. जेधे, एस. एम. येवले, डी. पी. अवचट, सी. जी. भोसले, डी. के. नायकवाडी, व्ही. टी. रानडे, जी. के. शेटे.

### विद्यालयांत पहिला आलेला विद्यार्थी

श्री. डी. डी. अनासपुरे:—सर जनार्दन मदन पारितोषिक रु. २५–००

### विद्यालयांत दुसरा आलेला विद्यार्थी

श्री. आर. एस. गदगे:—बाँबे को-ऑप. इन्शुअरन्स सोसायटी पारितोषिक. रु. १५–००

रा. पं. देशमुख,
प्रिन्सिपॉल.

---

### गुजरातमधील उद्योगधंद्यांना विजेचा पुरवठा

गुजरात राज्याचे मुख्य मंत्री डॉ. जिवराज मेहता ह्यांनीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत राज्यांत भासणारा विजेचा तुटवडा दूर करण्यांत येईल, असें आश्वासन दिलें आहे. राज्याच्या उद्योगधंदे–सल्लागार समितीपुढें ते बोलत होते. आपल्या भाषणांत ते म्हणाले कीं, राज्यांत नवीन उद्योगधंदे काढणाऱ्यांना इतर अडचणींबरोबरच विजेच्या अपुऱ्या पुरवठ्याला तोंड द्यावें लागत आहे. गेल्या मे महिन्यापासून नोव्हेंबर महिनाअखेरपर्यंत मध्यम व मोठ्या उद्योगधंद्यांसाठी मिळून १३२ अर्ज आले. त्या सर्वांचें मिळून अधिकृत भांडवल सुमारें ८५ कोटी रुपये आहे. ९१ अर्ज मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यासाठी आले व ४१ अर्ज मोठ्या उद्योगधंद्यांसाठी आले. उद्योगधंद्यांच्या प्रकाराप्रमाणें अर्जांची वर्गवारी अशी आहे. इंजिनिअरिंगचा धंदा: ४१; त्यापैकी १४ मोठ्या इंजिनिअरिंगच्या कारखान्यासाठी आले. विजेच्या वस्तु व उपकरणांचा धंदा: १८; त्यापैकी ४ मोठ्या कारखान्यांसाठी आले. रासायनिक कारखाने: १७; त्यापैकी ४ मोठ्या कारखान्यांसाठी आले. त्याशिवाय कागदाचा धंदा: १५; कापडाचा धंदा: ८; कांचेचा धंदा: ४. नव्या उद्योगधंद्यासाठी आलेले १३२ अर्ज सोडून ४९ अर्ज चालू उद्योगधंद्यांच्या वाढीची परवानगी मागण्यासाठी आले. गेल्या मे महिन्यापासून गुजरात राज्यांत १५७ नवे कारखाने स्थापन करण्यांत आले. त्यापैकी बहुतेक छोट्या व मध्यम उद्योगधंदेवाल्यांचे आहेत. मध्यम व मोठ्या प्रतीच्या उद्योगधंद्यांना लागणारी माहिती सरकार तज्ज्ञांकडून मिळवितें व त्यासंबंधीचा अहवाल कारखाने काढूं इच्छिणाऱ्यांना पुरवितें. उद्योगधंदे चालवितांना त्यांच्या चालकांना दैनंदिन प्रश्न सोडवावे लागतात. अशा प्रश्नांबद्दल सल्लामसलत देण्यासाठी सरकारनें एका स्थायी समितीची स्थापना केली आहे.

---

### साखर व्यापाऱ्यांस अधिक प्रमाणांत कर्ज मिळण्याची सोय

सन १९५९–६० मध्यें साखरेच्या उत्पादनांत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून १९६०–६१ मध्यें याप्रमाणेंच साखरेचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर होण्याची चांगलीच शक्यता आहे. साखरेच्या सांठ्याची परिस्थितीहि समाधानकारक असून गेल्या कांहीं महिन्यांत साखरेच्या किंमतीहि स्थिरावल्या आहेत. ही परिस्थिति लक्षांत घेऊन रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांस साखरेच्या सांठ्यावर अधिक प्रमाणांत कर्ज देण्याची सूचना केली आहे.

---

### त्रावणकोर फॉर्वर्ड बँक आणि इतर चार बँकांना मोरेटोरियम

भारत सरकारनें रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीवरून दुरुस्त बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या ४५ व्या कलमांतील तरतुदींनुसार, त्रावणकोर फॉर्वर्ड बँक, कोट्टायम्; दी बँक ऑफ न्यू इंडिया, त्रिवेंद्रम्; दी सिसिया मिडलॅण्ड बँक, अलेप्पी; कोट्टायम् ओरिएण्ट बँक, कोट्टायम् आणि वेनाडु बँक, पुलिनुकुन्नू या बँकांना ऋणमुक्त होण्यासाठी १८ डिसेंबर, १९६० ते १८ मार्च, १९६१ पर्यंत अवधि दिला आहे.

---

### भाक्रा धरणाची प्रगति

भाक्रा धरणांतील काँक्रीटचें काम डिसेंबर १९६१ च्या बेतास पूर्ण होण्याची अपेक्षा असून उरलेलें काम १९६२ अखेर पूर्ण व्हावें. या योजनेवर एकूण १७० कोटी रु. खर्च होण्याची अपेक्षा आहे.

---

### परकीय कर्जांवर परकीय चलनांत दिलेलें व्याज

भारत सरकारनें १९५९–६० मध्यें परकीय कर्जांवर परकीय चलनाच्या स्वरूपांत सुमारें १३·०३ कोटी रु. व्याज दिलें. याच कालांत सरकारी क्षेत्रांतील बिन–सरकारी संघटनांनीं व खाजगी क्षेत्रांतील संस्थांनीं परतफेड करावयाच्या परकीय कर्जांवर परकीय चलनांत सुमारें ४·२१ कोटी रु. व्याज म्हणून दिलें.

---

### चोरकप्पे असणाऱ्या आगबोटींना दंड

'गोल्डन अल्फा' आणि 'कॅपेला' ह्या दोन आगबोटींना कलकत्ता येथील कलेक्टर ऑफ कस्टम्सनीं अनुक्रमें १० हजार रु. व ५० हजार रु. दंड केला. जिनसा दडविण्यासाठी त्या आगबोटींत चोरकप्पे आढळले, त्यासाठी हें शासन करण्यांत आलें. दोन्हीं आगबोटींच्या स्थानिक एजंटांनीं दंड भरला.

---

### चलनविस्ताराचा इंडेक्स नंबर

खेळत्या चलनाचा इंडेक्स नंबर १९५६–५७ मध्यें ११८ होता, तो १९५८–५९ मध्यें १३१ आणि १९५९–६० मध्यें १४२ झाला.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

# अर्थ

बुधवार, ता. १८ डिसेंबर, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## संयुक्त अरब प्रजासत्ताकाला रशिआची मदत

आफ्रिकेमधील पाश्चात्य राष्ट्रांच्या वसाहती भराभरा स्वायत्त होऊं लागल्या आहेत. ह्या स्वायत्त झालेल्या वसाहतींच्या भरभराटीच्या मार्गांत सर्वांत मोठी कोणती अडचण असेल तर आर्थिक मागासलेपणाची होय. त्याचा फायदा घेऊन रशिया-अमेरिकेसारखीं प्रगत राष्ट्रें त्यांना मदत करीत आहेत. त्यामागील राजकीय हेतु कदाचित् कधींच स्पष्ट होणार नाहींत. पण मदत देण्याच्या स्पर्धेचा आफ्रिकी राष्ट्रांना फायदा होत आहे एवढें मात्र खरें. संयुक्त अरब प्रजासत्ताकाचे उपाध्यक्ष आपल्याबरोबर नऊ अर्थतज्ज्ञ घेऊन नुकताच मॉस्कोचा दौरा करून परत आले. त्यामुळें रशिआ व इजिप्त ह्यांच्यामधील संबंध अधिक घनिष्ठ होत चालल्याचें दिसत आहे. इजिप्तमधील आस्वान येथें बांधण्यांत येणाऱ्या धरणाला रशियाकडून मोठ्या प्रमाणावर मदत करण्यांत येत आहे. युक्रेनमधील ४० कारखाने धरणासाठीं लागणारी यंत्रसामग्री तयार करण्यांत गुंतले आहेत. आस्वानच्या धरणाच्या पाण्यानें भिजणारी जमीन पिकाला योग्य करण्यासाठींहि रशिआकडून मदत मिळणार आहे. ह्या कामासाठीं लागणाऱ्या यंत्रसामग्रीपैकी २५ टक्के यंत्रसामग्रीच रशिआ प्रथम देणार होता. पण, इजिप्तच्या सरकारतर्फे विनंती करण्यांत आल्यावरून आतां रशिआ ४० टक्के यंत्रसामग्री पुरविणार आहे. खुद्द आस्वानच्या धरणाला लागणाऱ्या साधनसामग्रीपैकीं ९५ टक्के भाग रशिआनें १९५९-६० सालांत पुरविला आहे. आस्वान येथील धरणाशिवाय इतर औद्योगिक कारखान्यांसाठींहि रशिआकडून मदत मिळणार आहे. दुर्बिणी, शास्त्रीय उपकरणें, इत्यादि वस्तूंना लागणाऱ्या कांचा तयार करण्याचा एक कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे.

## श्रीमंतीच्या प्रदर्शनावर कर बसविण्यांत आला

१९ व्या शतकांत राज्यसंस्थेचें कार्य बरेच मर्यादित होतें. नागरिकांनीं आपआपले व्यवसाय करीत असावे व सरकारनें कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पार पाडावी, अशा तऱ्हेनें समाजाचा गाडा चालत असे. पण पहिल्या व नंतर दुसऱ्या महायुद्धाचा एक परिणाम असा झाला कीं, राज्यसंस्थेच्या कार्याचें क्षेत्र वाढलें. समाजहित साधण्याचें साधन म्हणून राज्यसंस्थेचा अधिकांत अधिक उपयोग होऊं लागला. त्याबरोबरच राज्यसंस्थेला राज्यकारभार चालविण्यासाठीं अधिकाधिक पैसा लागू लागला. परिणामत: उत्पन्न वाढविण्यासाठीं नवे नवे कर बसविण्यांत येऊं लागले. अशाच प्रकारचा एक नवा कर इटालिअन सरकारच्या अर्थखात्यानें जाहीर केला आहे. श्रीमंती दाखविण्यासाठीं भारी पोषाख करणें अगर तत्सम इतर गोष्टी करणें ह्यांवर नवा कर बसविण्यांत आला आहे. लोकांच्या डोळ्यांत भरण्यासारख्या रीतीनें कोणीहि पैसा खर्च केला, तर त्या माणसावरील कर-आकारणी विशेष कटाक्षानें करण्यांत यावी असा आदेश आकारणी अधिकाऱ्यांना देण्यांत आला आहे. इटलीमध्यें २० लाख लोक नेहमींच बेकार असतात आणि त्याच वेळीं रात्रीच्या क्लबांतून दोन दोन हजार रुपयांचीं तिकिटें काढून चैन करणारे लोकहि आहेत. संपत्तीचें प्रदर्शन करण्याची हौस आपल्याकडेहि आहेच. किंबहुना मनुष्याच्या स्वभावाची ती एक स्थायी प्रवृत्ति आहे असें म्हटलें तरी चालेल. तरीपण संपत्तीच्या प्रदर्शनाला नेटक्या व्याख्येच्या चौकटींत बसविणें अवघडच जाईल. भारतांत लग्नसमारंभप्रसंगीं संपत्तीचें अवास्तव प्रदर्शन करण्यांत येतें, हें सर्वांनाच माहीत आहे.

## कलकत्ता येथील राष्ट्रीय शेतकी प्रदर्शन

कलकत्ता येथें भारत कृषक समाजातर्फे राष्ट्रीय शेतकी प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. प्रदर्शनाचें उद्घाटन ता. ८ जानेवारी रोजीं उपराष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् ह्यांचे हस्तें होणार असून त्याच्या तयारीला जोरानें सुरुवात करण्यांत आली आहे. भारतांत अशा प्रकारचें प्रदर्शन पहिल्यानेच भरविण्यांत येत आहे. प्रदर्शन भरविण्याच्या जागेसाठी ३० एकर जमिनीची निवड करण्यांत आली असून त्या जागीं एक लहानसें शहरच उभारण्यांत येत आहे. मध्यवर्ती सरकारचीं अनेक खातीं, शेतीच्या अवजारांचे कारखानदार व ती आयात करणारे व्यापारी ह्या प्रदर्शनांत भाग घेणार आहेत. जपान व रशिआ ह्या देशांचीं सरकारें आपआपल्या देशांत तयार झालेलीं व शेतकीच्या व्यवसायांत वापरण्यांत येणारीं अनेक अवजारें प्रदर्शनांत ठेवणार आहेत. जपानी शेतकऱ्यांची एक तुकडी प्रदर्शनासाठीं मुद्दाम येणार आहे. जपानी पद्धतीनें भाताची लागवड कशी करतात त्याचें प्रात्यक्षिक ही तुकडी करून दाखविणार आहे. राज्य सरकारांपैकीं दहा सरकारें प्रदर्शनांत जागा घेणार आहेत. ग्रामीण उद्योगधंदे व घरबांधणी ह्या विभागांत खादीबोर्ड भाग घेणार आहे. ह्या विभागांत पश्चिम जर्मनीचें सरकारहि जागा घेणार आहे. प्रदर्शनांत लोकांच्या मनोरंजनाची भरपूर सोय करण्यांत येणार आहे. प्रदर्शन पाहण्यासाठीं निदान १०,००० शेतकरी येतील, असा अंदाज करण्यांत आला आहे. अर्थात् ओरिसा, आसाम, बिहार, पश्चिम बंगाल, इत्यादि राज्यांतुन येणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक असेल. प्रदर्शनासाठीं सुमारें ४० लाख रुपयांपर्यंत खर्च येईल.

## कंपनी सेक्रेटरींसाठी परीक्षा

कंपनी सेक्रेटरी पात्रतेसाठीं ठेवण्यांत आलेली पहिली प्रिलिमिनरी व इंटर मिडिएट परीक्षा पूर्वी जाहीर केल्याप्रमाणें १ ते ४, ६ व ७ मार्च, १९६१ रोजीं न होतां ६ ते ११ मार्च, १९६१ पर्यंत होईल असें डिपार्टमेंट ऑफ कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशननें जाहीर केलें आहे. प्रिलिमिनरी परीक्षेसाठीं प्रवेश-अर्जे पोहोंचण्याची शेवटची तारीख व रजिस्टर्ड उमेदवारांकडून इंटरमिडिएट परीक्षेसाठीं प्रवेश अर्जे पोहोंचण्याची शेवटची तारीख २० डिसेंबर १९६० आहे. या परीक्षांसाठीं ठरविण्यांत आलेलीं केंद्रें तींच राहतील.

## कृष्णा–गोदावरी नद्यांच्या पाण्याचें वांटप

### महाराष्ट्र सरकार प्रश्न तडीस लावणार

जुलै १९५१ मध्यें नियोजन मंडळानें कृष्णा व गोदावरीच्या खोऱ्यांतील राज्यांची बैठक घेतली होती. या दोन नद्यांचें पाणी त्या वेळीं तयार असलेल्या योजनांना किती लागेल या दृष्टीनें विचार करणें व तीं कामें त्वरित हातीं घेणें हा या बैठकीचा मूळ उद्देश होता. परंतु, दोन दिवसांच्या विचारविनिमयानंतर कृष्णा व गोदावरीच्या पाण्याचें २५ वर्षांसाठीं राज्यवार वांटप करण्याचें ठरवण्यांत परिषदेची परिणति झाली!

या १९५१ च्या करारांत २५ वर्षांनंतर त्याचा पुन्हा फेरविचार करण्याची तरतूद आहे. या २५ वर्षांमध्यें बहुतेक संभाव्य योजना पूर्ण होणार असल्यामुळें आणि जवळ जवळ सर्व उपलब्ध पाणी या योजनांसाठी राखून ठेवावें लागणार असल्यामुळें या फेरविचारास कांहींच अर्थ उरणार नाहीं.

### करार मान्य कां नाहीं !

हा करार अनेक दृष्टींनीं सदोष असल्यामुळें उपलब्ध पाण्याचें निरंतरचें वांटप म्हणून तो मान्य करणें महाराष्ट्र सरकारला योग्य वाटत नाहीं.

(अ) १९५१ च्या करारासाठी, किती पाणी उपलब्ध आहे याचा जो हिशोब केला गेला त्यांत बऱ्याच चुका आहेत. एक मोठी चूक अशी कीं, इरिगेशनला वापरलेल्या पाण्यापैकी १५ ते २० टक्के पाणी पाझरून परत नदीला येऊन मिळतें (रिजनरेशन), त्याचा उपयोग प्रवाहाच्या खालच्या भागांत (फिरून) होऊं शकतो, ही गोष्ट हिशेबांत धरावी हा मुद्दा इंजिनिअर्सनीं उपस्थित केला असतांनाहि विचारांत घेतला गेला नाहीं.

(ब) नदींतून वाहून जाणाऱ्या पाण्याचा सांठा दरसालच्या पर्जन्यमानाप्रमाणें दरवर्षी बदलता असतो. १०० वर्षांत ७५ वर्षे नक्की मिळूं शकेल इतक्या सांठ्याला ७५ टक्के खात्रीचा सांठा म्हणतां येईल (७५ टक्के डिपेंडेबिलिटी). हल्लीं इरिगेशन योजना ७५ टक्के खात्रीच्या सांठ्यावर आधारल्या जातात. कृष्णा-गोदावरीच्या १९५१ च्या वांटपांत मात्र अनुक्रमें ८६ टक्के व ८९ टक्के खात्रीचा सांठा विचारांत घेण्यांत आला होता. ह्यामुळें ७५ टक्के व ८६/८९ टक्के यांतील फरकाइतका पाण्याचा सांठा वांटपासाठी विचारांतच घेण्यांत आला नव्हता.

(क) चर्चेंत भाग घेणाऱ्या राज्यांनीं आपआपल्या योजनांसाठी पाण्याची मागणी केली. ज्यांचें काम लगलीच हातीं घेतां येईल अशाच महाराष्ट्रांतील योजना मुंबई राज्यातर्फे सादर करण्यांत आल्या. (अशा तऱ्हेच्या योजनांचाच केवळ विचार करावयाचा असाच अधिवेशनाचा मूळ उद्देश होता). इतर कांहीं राज्यांनीं नीट तयार नसलेल्या व अंदाजी स्वरूपाच्या योजनाहि सादर केल्या, आणि त्यासाठी पाण्याच्या सांठ्याची भरमसाठ मागणी केली. या योजनांची किंवा त्यासाठी तरतूद केल्या गेलेल्या पाण्याची छाननी अधिवेशनांत किंवा तत्पूर्वी कधींच करण्यांत आली नव्हती.

### मद्रास राज्याची भरमसाठ मागणी मंजूर झाली

मुंबई राज्यातर्फे पाणीपुरवठ्यासाठी ११० हजार दशलक्ष घनफूट इतक्या माफक पाण्याची मागणी केली गेली, तर मद्रास राज्यानें आपल्या नवीन प्रकल्पासाठी ९५० हजार दशलक्ष घनफूट पाण्याची मागणी केली. या परिषदेंत करण्यांत आलेल्या अंदाजानुसार नवीन योजनांसाठी १००० हजार दशलक्ष घनफूट इतकेंच पाणी उपलब्ध होतें आणि त्यापैकी ९५० हजार दशलक्ष घनफूट पाण्याची एकट्या मद्रास राज्यानें मागणी केली. या मागणीपैकी ८२५ हजार दशलक्ष घनफूट पाणी फक्त कृष्णा–पेन्नार या एकाच योजनेसाठी होतें. १९५१ च्या परिषदेनें त्यावेळचे अस्तित्वात असलेले, व काम चालू असलेले प्रकल्प यांसाठी लागणारें पाणी बाजूला काढून उरलेल्या पाण्याचें, निरनिराळ्या प्रकल्पांसाठी मागितलेल्या पाण्याच्या प्रमाणानुसार टक्केवार वांटप केलें. ज्या निरनिराळ्या प्रकल्पांसाठी पाण्याची मागणी करण्यांत आली होती त्यांची पुरेशी छाननी करण्यांत आली नव्हती ही गोष्ट आतां सिद्ध झाली आहे. त्या वेळीं सुचविलेल्या योजनांपैकी पुष्कळ योजना नंतर संपूर्णपणें सोडून देण्यांत आल्या अथवा त्यामध्यें खूपच बदल करण्यांत आले, ह्या एका गोष्टीवरूनच वरील विधानाची सत्यता पटण्यासारखी आहे.

### पाणी–वाटपांतील अन्याय

१९५१ च्या करारानुसार करण्यांत आलेलें पाणीवांटप कशा-प्रकारचें होतें हें खालील तक्त्यावरून दिसून येईल. निरनिराळ्या राज्यांतील कृष्णा नदीच्या खोरें विभागासंबंधानें हें वांटप करण्यांत आलें होतें.

| राज्य | खोरें विभाग (चौ. मैल) | एकंदर खोरें विभागाची टक्केवारी | पाणी वांटप (ह. द. घ.) | एकंदर वांटपाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ... ३८,००० | ३९·२ | ४१६ | २३·८५ |
| म्हैसूर | ... ११,१०० | ११·४ | १०८·५ | ६·२४ |
| हैद्राबाद | ... ३५,४५० | ३६·५ | ४६० | २६·३७ |
| मद्रास | ... १२,५०० | १२·९ | ७६० | ४३·५४ |

वरील तक्त्यावरून असें दिसून येईल कीं, मुंबई राज्याचा कृष्णाखोऱ्यांतील प्रदेश ३९·२ टक्के असतांना पाणीवांटपांत मात्र त्यास २३·८५ टक्के इतकेंच पाणी मिळालें तर, मद्रास राज्याच्या ह्याच खोऱ्यांतील १२·९ टक्के प्रदेशाच्या मानानें ह्या राज्यास ४३·४ टक्के या प्रमाणांत पाणी मिळालें.

पाणीवांटपाचे वेळीं खोरें विभागाच्या टक्केवारीचें प्रमाण हा निकष न लावतां ह्या खोऱ्यांतील पाणलोटांतून येणाऱ्या पाण्याचें प्रमाण, हा निकष लावला तर मुंबई राज्यास मिळणारें पाणी अधिकच कमी मिळालें आहे, असें दिसून येईल. १९५६ च्या राज्य-पुनर्रचनेनंतर म्हैसूर राज्यांत गेलेला कृष्णा खोऱ्यांतील प्रदेश धरून पूर्वीच्या मुंबई राज्यांतील प्रदेशांतून नदीला एकूण पाण्याच्या ५० टक्के पाणी मिळत होतें आणि वांटपाचे वेळीं मात्र त्यांत २३·८५ टक्के इतकें पाणी देण्यांत आलें.

या वांटपाचे वेळीं कृष्णा खोऱ्यांतील दुष्काळी आणि निम–दुष्काळी भागांच्या निकडीच्या गरजांकडेहि लक्ष देण्यांत आलें नव्हतें. दुष्काळी भागांपैकी बराचसा भाग महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत असून सध्यांच्या आंध्र राज्यांत त्यांपैकी फक्त १४·२ टक्के इतकाच भाग आहे, आणि तरीसुद्धां त्या वेळचे मद्रास राज्यांतील आंध्र विभागास १९५१ च्या पाणीवांटपांत अवास्तव वांटा मिळाला आहे.

नद्यांच्या पाणीवांटपाचे वेळीं नदी–खोऱ्यांतील प्रदेशांस त्याच्या बाहेरील भूभागापेक्षा अधिक प्राधान्य मिळावें हें तत्त्व सर्वमान्य असें आहे. १९५१ च्या पाणीवांटपांत जास्तींत जास्त वांटा मिळून गेलेल्या कृष्णा–पेन्नार प्रकल्पांत या पाण्यांतील बराचसा भाग कृष्णा खोऱ्याच्या बाहेर वळविण्याचा इरादा होता. कृष्णा खोऱ्यांतील दुष्काळग्रस्त भागांस पाण्याचा कायमचा

पुटवड्या सहन करावयास लावून नदीचें पाणी खोऱ्याबाहेरील अवांतर प्रदेशांस देणें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं.

देशांतील एकूण लागवडीजोग्या विभागांतील इरिगेशनची टक्केवारी पाहतां महाराष्ट्रांत हें प्रमाण सर्वांत कमी आहे. १९५६–५७ सालीं सबंध भारतांत हें प्रमाण सरासरी १७·२ टक्के इतकें होतें. महाराष्ट्रांत तें ५·६ टक्के इतकें होतें. आंध्र राज्यांत १९५६–५७ सालीं हें प्रमाण २७·२ टक्के, मद्रास राज्यांत ४२·२ टक्के, पंजाबमध्यें ३८·४ टक्के आणि उत्तर प्रदेशांत तें २३·६ टक्के इतकें होतें. अलीकडेच महाराष्ट्रांतील नदी-खोऱ्यासंबंधीं केलेल्या मास्टर प्लॅनिंगमध्यें असें दिसून आलें कीं, सर्वसाधारणतः प्रत्येक नदीच्या खोऱ्यांतील लागवडीयोग्य विभागाच्या १६ किंवा १८ टक्क्यापेक्षा अधिक जमीन पाण्याखाली आणणें शक्य होणार नाहीं.

### न्याय्य वांटणीचीं तत्त्वें

१९५१ च्या कराराचा पुनर्विचार झालाच पाहिजे; कारण त्यांत अनेक ढोबळ दोष आहेत आणि तो कायदेशीर रीत्याहि रास्त नाहीं. नद्यांचे पाणी १९५१ च्या तत्त्वशून्य कराराप्रमाणें नव्हें, तर न्याय्य वांटणीच्या तत्त्वावर वांटलें जावें, या दृष्टीनें महाराष्ट्र सरकारनें पुढील तत्त्वें आपल्या निवेदनांत सुचविलीं आहेत :—

" ( १ ) प्रत्येक राज्यांत असलेल्या नदी-खोऱ्यांतील लागवडीयोग्य प्रदेश विचारांत घेऊन तसेंच नदींतील प्रवाहाच्या एकूण पाण्यांत प्रत्येक राज्याकडून किती भर पडते याचा विचार करून प्रत्येक राज्याचा वांटा ठरविण्यांत यावा.

" चालू योजनांत करण्यांत येणाऱ्या पाण्याचा वापर हा ' स्वीकृत ' म्हणून समजण्यांत यावा, परंतु तो प्रत्येक राज्याला मिळणाऱ्या पाण्याच्या वांट्याच्या नांवें टाकण्यांत यावा.

" नदी खोऱ्यांत राहणाऱ्या लोकांना खोऱ्यांतील पाण्याचा उपयोग करण्याचा अग्रहक्क आहे. म्हणून नदी-खोऱ्यांत वसलेल्या विभागाचे त्या नदीच्या पाण्यावर मूलभूत हक्क असले पाहिजेत.

" दुष्काळी व पुटवड्याच्या विभागांतील पाटबंधाऱ्यांच्या गरजांना विशेष प्राधान्य देण्यांत यावें.

" ( २ ) पाटबंधाऱ्यांच्या कामासाठी ठरविण्यांत आलेल्या सी. डब्ल्यू. व पी. सी. च्या प्रमाणानुसार, ७५ टक्के खात्रीचें पाणी हा, पाण्याचा वांटा ठरविण्यासाठी आधार समजण्यांत यावा व याशिवाय पाझरानें मिळणारें जादा पाणीहि हिशेबांत घरण्यांत यावें.

" ( ३ ) कोणत्याहि राज्याला पाण्याच्या स्वतःच्या वांट्यापैकी, मर्जीप्रमाणें पाटबंधाऱ्यासाठी अथवा विद्युत्‌निर्मितीसाठी खोऱ्यांबाहेर उपयोग करतां येईल. तथापि, दुसरीकडे असें पाणी नेण्यामुळें, असें मूळ खोऱ्याला पाझर न मिळाल्यानें जेवढें पाणी कमी पडेल तें, त्या राज्याच्या नांवें टाकण्यांत यावें.

" ( ४ ) एखाद्या राज्याला आपल्या वांट्याच्या पाण्याचा पूर्णपणें वापर करतां न आला तर, उपयोग न होणारा पाण्याचा हा वांटा, उरलेल्या राज्यांमध्यें वापर करण्यासाठी देण्यांत यावा."

कृष्णा व गोदावरी या नद्यांच्या पाण्याच्या वांटपाचा प्रश्न राष्ट्रीय दृष्टिकोणांतून हाताळण्यांत आला पाहिजे आणि त्या बाबतींत महाराष्ट्र राज्याचे तसेच इतरहि राज्यांचे न्याय्य हितसंबंध सांभाळण्यांत आले पाहिजेत, असा महाराष्ट्र सरकारचा दृष्टिकोण आहे. कृष्णा–गोदावरीच्या पाण्याच्या कायम वांटपाचा प्रश्न संबंधित राज्यांत राहणाऱ्या कोट्यवधि लोकांशीं निगडित आहे. अशा प्रकारच्या प्रश्नाची सोडवणूक न्याय्य व संबंधित अशा सर्व भागास हितकर अशा तत्त्वावर झाली पाहिजे.

## बेडेकर पति–पत्नी रौप्यतुला समारंभ
### ( २६ जानेवारी १९६१ )

महाराष्ट्रांत ज्यांचें नांव मशहूर आहे त्या " व्ही. पी. बेडेकर मुंबई अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड " या कंपनीचा सुवर्णमहोत्सव येत्या २६ जानेवारीला मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचें योजण्यांत आलें आहे. या वेळीं बेडेकर बंधूंपैकी सर्वांत थोरले श्री. वासुदेवराव बेडेकर यांची षष्ट्यब्दिपूर्तीहि भव्य प्रमाणावर साजरी करण्यांत येणार आहे. या वेळीं श्री. वासुदेवराव बेडेकर व त्यांच्या पत्नी सौ. रखमाबाई बेडेकर या दोघांची रौप्यतुला करण्यांत येणार असून, जवळ जवळ २५,००० रुपयांची रक्कम गरजू व होतकरू विद्यार्थ्यांच्या साहाय्यार्थ देण्यांत येणार आहे.

पति–पत्नींच्या रौप्यतुलेचें ( एकत्र ) हें कदाचित् पहिलेंच उदाहरण असण्याची शक्यता आहे. व्यापारधंद्याच्या क्षेत्रांत यशस्वी होणाऱ्या व्यक्तीच्या यशाचा निम्मा वांटा खरा त्याच्या सहधर्मचारिणीचाच असतो. त्या दृष्टीनेंच श्री. वासुदेवराव बेडेकर यांनीं आपल्याबरोबर आपल्या पत्नीचीहि रौप्यतुला करण्याचें ठरवून त्यांचा जो यथोचित बहुमान केला आहे ती आधुनिक भारतांतील स्त्री–पुरुष समानतेच्या युगांतील मोठी अभिनंदनीय घटनाच म्हटली पाहिजे.

दोन–चार पुस्तकांपेक्षा जास्त शिक्षण झालेलें नसतां वडिलांच्या किराणामालाच्या धंद्यांत श्री. वासुदेवराव यांनीं आपल्या कल्पकतेनें मसाला आणि लोणचीं तयार करण्याच्या कारखानदारी व्यवसायाची जोड देऊन भारतांत आणि भारताबाहेरहि मोठें नांव कमविलें आहे. महाराष्ट्रीय लोकांजवळ जी भांडवलाची तूट आहे ती त्यांनीं आपल्या धंद्यांना कल्पकतेची जोड देऊन भरून काढावी, हाच श्री. वासुदेवराव बेडेकरांच्या यशस्वी व्यापारी जीवनाचा विशेष आहे. श्री. बेडेकरांच्या षष्ट्यब्दिपूर्ति व धंद्याच्या सुवर्णमहोत्सवसमारंभाच्या वेळीं महाराष्ट्रांतील इतर नामवंत संस्थांनाहि या वेळीं यथोचित देणग्या दिल्या जाणार आहेत. मुंबईतील ' श्यामलप्रकाशन ' या संस्थेतर्फे श्री. वासुदेवराव बेडेकरांचें आत्मचरित्रहि याच सुमारास प्रसिद्ध होणार आहे.

हे सर्व समारंभ गिरगांवांतील ब्राह्मणसभेच्या सभागृहांत होणार आहेत.

---

**जीवशास्त्राबाबत संशोधन केंद्र**—कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संस्थेचे डायरेक्टर प्रा. थॅकर ह्यांनीं अशी माहिती सांगितली कीं, येत्या ५ वर्षांत जीवशास्त्रविषयक एक संशोधन केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. गेल्या दहा वर्षांत पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र ह्यांच्याकडेच अधिक लक्ष देण्यांत आलें असें त्यांचें म्हणणें आहे.

**रबराच्या लागवडीसाठी जमीन**—केरळ राज्यांतील सरकारी मालकीच्या १५,००० एकर जंगल जमिनींत रबराची लागवड करण्यांत येणार आहे. त्यासाठी जंगल सफाईचें काम सुरू करण्यांत आलें आहे. जमीन नसलेले गरीब, सुशिक्षित बेकार, छोटे शेतकरी, खाजगी भांडवलाच्या कंपन्या व राज्य सरकार ह्या सर्वांना जमीन देण्यांत येणार आहे.

**मच्छीमारीच्या धंद्याचा विकास**—मद्रास राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मच्छीमारीच्या धंद्याच्या विकासासाठी २२२ लाख रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत येणार आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमापेक्षा तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत माशांचें उत्पादन २५ टक्के वाढविण्याचा राज्य सरकारचा विचार आहे.

## उपलब्ध जलसम्पत्तीचा जास्तींत जास्त उपयोग

### पाटबंधारे मंडळाची स्थापना

महाराष्ट्रांतील समग्र जलसम्पत्तीचा जलविद्युत, पाटबंधारे, पाणीपुरवठा व उद्योगधंदे यांसाठी जास्तींत जास्त उपयोग कसा करून घेतां येईल या गोष्टीचा विचार करण्याकरतां व पाटबंधाऱ्यांच्या प्रचलित प्रश्नांवर विचार करून सरकारला मार्गदर्शन करण्याकरतां, महाराष्ट्र सरकारनें एक पाटबंधारे मंडळ स्थापन करण्याचें ठरविलें आहे. महाराष्ट्र सरकारच्या पाटबंधारे व विद्युत खात्याचे सचिव श्री. स. गो. बर्वे हे या मंडळाचे अध्यक्ष असून, त्यांच्यासह इतर १२ सभासद मंडळावर आहेत. हे सभासद पुढीलप्रमाणें:—श्री. डी. आर. गाडगीळ, श्री. एम्. एल्. चाफेकर, श्री. अण्णासाहेब शिंदे, आमदार श्री. दत्ता देशमुख, श्री. यशवंतराव गिरमे, खासदार श्री. के. जी. गिरमे, अमरावती, श्री. श्रीपतराव कदम, बीड, श्री. एस्. पी. मोहिते, ॲग्रिकल्चरल कमिशनर, श्री. जी. एन. पंडित, मुख्य इंजिनिअर (पाटबंधारे योजना) व सहसचिव, श्री. डी. ए. गडकरी (सभासद व साहाय्यक सचिव) आणि श्री. एस. के. बेडेकर, सचिव.

### मंडळाचें कार्यक्षेत्र

पाटबंधाऱ्याच्या छोट्या व मोठ्या योजना, बंधारे व विहिरी इत्यादींच्या खर्चाचा व त्यापासून मिळणाऱ्या फायद्याचा तौलनिकरीत्या विचार करून ह्या योजनांचें राज्याच्या जलविकास योजनेंतील योग्य स्थान ठरवून त्यानुसार राज्याच्या जलविकास योजनेची रूपरेषा तयार करणें ही कामगिरी या मंडळाकडे सोंपविण्यांत आली आहे. पाटबंधाऱ्याच्या क्षेत्रांत कोणकोणतीं पिकें काढावींत त्याचप्रमाणें व्यक्तिगत बागायतदार, साखरकारखाने आणि इतर उद्योगधंदे यांना पुरविल्या जाणाऱ्या पाण्याच्या वांटपासंबंधीं सर्वसाधारण काय धोरण असावें याचाहि वरील मंडळ विचार करील. याशिवाय पाटबंधारेखात्याच्या दैनंदिन कार्यपद्धतींत करावयाच्या सुधारणा आणि बागायतदारांच्या सहकारी संस्थांमार्फत पाणीवांटप करून तदनुषंगानें पाटबंधाऱ्यांच्या कारभारपद्धतीचें विकेंद्रीकरण होऊं शकेल काय याचाहि विचार या मंडळाच्या कक्षेंत येईल. सुधारलेलीं बीं–बियाणें आणि खतें यांचा पुरवठा, कर्जव्यवस्था इत्यादि शेतीच्या धंद्याशीं संबंधित असलेल्या बाबतींचा बागायती क्षेत्राच्या अनुषंगानें विचार करून त्यासंबंधीं हें मंडळ सरकारला शिफारशी करील.

पाटबंधारेविषयक योजनांचा खर्च व त्यांतून होणारी प्राप्ति यांचा मेळ घालण्याच्या दृष्टीनें बेटरमेंट लेव्ही, पाणीपट्टी, इरिगेशस सेस यांचे दर काय असावेत याचाहि मंडळ विचार करील.

### पूर्वपीठिका

पाटबंधाऱ्यांच्या प्रश्नांसंबंधीं विचार करण्याच्या दृष्टीनें, १९३८ सालीं श्री. विश्वेश्वरअय्या यांच्या अध्यक्षतेखालीं एक समिति नेमण्यांत आली होती. परंतु मध्यंतरच्या काळांत देशांत हातीं घेतलेल्या मोठमोठ्या योजनांमुळें नवे प्रश्न उपस्थित झाले व यासंबंधींच्या एकंदर परिस्थितींत आमूलाग्र बदल झाला. त्यामुळें वरील मंडळाची आवश्यकता निर्माण झाली. आपल्या देशांतील इतर राज्यांच्या मानानें महाराष्ट्र राज्यांत पाटबंधाऱ्यांच्या क्षेत्राचें प्रमाण फारच कमी आहे. उत्तरेकडील गंगा-यमुनांच्या खोऱ्यांतील विस्तीर्ण व सपाट प्रदेश किंवा दक्षिणेकडील कृष्णा व गोदावरीच्या मुखाजवळील प्रदेश यांच्याशीं तुलना करतां महाराष्ट्रांतील प्रदेशाच्या उंचसखलपणामुळें येथील पाटबंधाऱ्यांच्या योजना बऱ्याच अवघड असतात. पाण्याचा सांठा करण्यासाठी मोठमोठीं धरणें बांधावीं लागतात. शिवाय कालवे खोदण्यासाठींहि बराच खर्च येतो. त्यामुळें इकडील पाटबंधाऱ्यांचे प्रश्न अतिशय महत्त्वाचे व तितकेच गुंतागुंतीचे झाले आहेत.

वरील मंडळाचें काम एक वर्षाच्या आंत पुरें होईल असा अंदाज आहे. राज्याच्या निरनिराळ्या विभागांना भेटी देऊन पाटबंधाऱ्यांच्या प्रश्नांतील हितसंबंधित व्यक्ती व संस्था यांचीं मतें विचारांत घेऊन मंडळ आपल्या शिफारशी करील.

---


### महाराष्ट्र राज्यांतील १९६१ मधील सार्वजनिक सुट्ट्या

महाराष्ट्र सरकारनें, १९६१ मधील पुढील दिवस सार्वजनिक सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर केले आहेत:—

भारतीय प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी–६ माघ), महाशिवरात्रि (१३ फेब्रुवारी २४ माघ) होळी (दुसरा दिवस) (३ मार्च–१२ फाल्गुन) गुढी पाडवा (१७ मार्च–२६ फाल्गुन), जमशेदी नवरोज (२१ मार्च–३० फाल्गुन), रामनवमी (२५ मार्च–४ चैत्र), महावीर जयंती (३० मार्च–९ चैत्र), गुड फ्रायडे (३१ मार्च–१० चैत्र), आंबेडकर जयंति (१४ एप्रिल–२४ चैत्र), शिवाजी जयंति. (१७ एप्रिल–२७ चैत्र), महाराष्ट्र दिन (१ मे–११ वैशाख), बकरी ईद (इद–उल–अझा) (२६ मे–५ ज्येष्ठ), मोहरम (अशुरा किंवा १० वा दिवस (२४ जून–३ आषाढ), लोकमान्य टिळक पुण्यतिथि (१ ऑगस्ट–१० श्रावण), स्वातंत्र्य दिन (१५ ऑगस्ट–२४ श्रावण) ईद-ए-मिलाद (२४ ऑगस्ट–२ भद्र), पार्शी नव वर्ष (३१ ऑगस्ट–९ भद्र) गोकुळ अष्टमी (२ सप्टेंबर–११ भद्र) खोरदाद साल (५ सप्टेंबर–१४ भद्र), गणेश चतुर्थी (१४ सप्टेंबर–२३ भद्र), संवत्सरी (१४ सप्टेंबर–२३ भद्र), महात्मा गांधी जयंति (२ ऑक्टोबर–१० आश्विन), दसरा (१९ ऑक्टोबर–२७ आश्विन), दिवाळी (२ दिवस म्हणजेच दिवाळी व नवीन वर्ष-दिन) (८ व ९ नोव्हेंबर–१७ व १८ कार्तिक), आणि खिसमस (२५ डिसेंबर–४ पौष).

नवीन वर्ष दिन (१ जानेवारी–११ पौष) आणि रमझान इद (१९ मार्च–२८ फाल्गुन) हे रविवारीं येत असल्यामुळें वरील दिवस सार्वजनिक सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर करण्यांत आलेले नाहींत.

---


आज बाजारांत अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यावरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनीं प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.
महाराष्ट्र
१८९९–१९६०
दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

### परदेशी कर्ज ६७१ कोटी रुपये झालें

१ ऑक्टोबर, १९६० रोजीं भारताला परदेशांचें ६७०·८ कोटी रुपये देणें होतें. १९६१–६२ ते १९७०–७१ ह्या मुदतींत त्यापैकी ३६६·३९ कोटी रु. चें कर्ज फेडावें लागेल. परतफेडीचा तपशील असा :—

| वर्ष | परतफेडीची रकम ( कोटी रु. ) |
|---|---|
| १९६१–६२ | २७·१४ |
| १९६२–६३ | ३६·८९ |
| १९६३–६४ | ५०·०८ |
| १९६४–६५ | ३०·९० |
| १९६५–६६ | ३४·११ |
| १९६६–६७ | ३९·०० |
| १९६७–६८ | ३९·६७ |
| १९६८–६९ | ३७·७३ |
| १९६९–७० | ३९·५७ |
| १९७०–७१ | ३१·८९ |

### विलिनीकरण

इंडो-कमर्शिअल बँकेचें पंजाब नॅशनल बँकेंत आणि न्यू सिटिझन बँकेचें बँक ऑफ बरोडामध्यें विलिनीकरण होणार आहे.


**५०** वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईंतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ **सरदारगृह** ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


### औद्योगिक बातमीपत्र : नवीन त्रैमासिक

महाराष्ट्र सरकारच्या उद्योगधंदे संचालनालयाकडून प्रसिद्ध होणाऱ्या औद्योगिक बातमीपत्राचें ( इंडस्ट्रिअल बुलेटिन ) तिमाही अंक आतां वर्गणीदारांना मिळूं शकतील. या चार तिमाही अंकाची वार्षिक वर्गणी ४ रु. असून त्याची एक प्रत ही प्रत्येकी १ रु. या किंमतीस मिळूं शकेल.

या बातमीपत्रांत महाराष्ट्राच्या औद्योगीकरणासंबंधी त्याचप्रमाणें या कार्याची प्रगति आणि विकास, निरनिराळ्या नवीन उद्योग-धंद्यांची तांत्रिक आणि कार्यपद्धतिविषयक माहिती त्याचप्रमाणें आर्थिक आणि औद्योगिक स्वरूपाची महत्त्वाची आंकडेवार माहिती असते. या बातमीपत्रांत कांहीं लेख मराठींतूनहि असतात.

या प्रकाशनाचा पहिला अंक प्रजासत्ताकदिन अंक असून तो जानेवारी, १९६१ च्या तिसऱ्या आठवड्यांत प्रसिद्ध होईल. य प्रकाशनाचे वर्गणीदार होऊं इच्छिणाऱ्यांनीं आपली वर्गणी अकाऊंटस ऑफिसर, डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज, सचिवालय, अनेक्स, मुंबई–३२ यांच्याकडे पाठवावी. त्याचप्रमाणें त्यांना आपली वर्गणी या खात्याच्या मुंबई, नागपूर, पुणें आणि औरंगाबाद येथील प्रादेशिक अधिकारी, अथवा उपप्रादेशिक अधिकारी किंवा जवळच्या इंडस्ट्रीज इन्स्पेक्टरांकडे भरतां येईल.


**अन्नाचें रहस्य**





**बेडेकर मसाले, लोणचीं, पापड**

ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— दु. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —



**किर्लोस्कर**

**लोखंडी नांगर**

भारी, मध्यम प्रतीच्या व रेताड जमीनीच्या सर्वोत्कृष्ट नांगरटीसाठीं निरनिराळ्या बनावटीचे लहान मोठे नांगर तयार होतात. आपल्या जमीनीच्या नगदुरा प्रमाणे योग्य अशा नांगराची निवड करा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**

किर्लोस्करवाडी

(जि सांगली)

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

(शेड्यूल्ड बँक)

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

# दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

वसूल शेअर भांडवल : रुपये सहा लाख
खेळतें भांडवल : रुपये एक कोट
रिझर्व्ह फंड व इतर फंड : रुपये सात लाख

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

(१) तीन वर्षे मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.
(२) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखाः सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन. पी. कानिटकर, ॲडव्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

# (शिड्यूल्ड बँक) दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें (स्थापना १९३६)

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. (फोन नं. ६५६३)

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. (फोन नं. २५३४०८)

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी (प्रोप्रायटर—कमलाकांत छोटालाल अँड को. (इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे (सुपरिंटेंडेंट, पैसाफंड काच कारखाना) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे (डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें)
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे (ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव)
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य (इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर)
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई (मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई)
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत (प्रोप्रायटर, राम एजन्सी) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत (व्यापारी) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—बी. वाय्. पाठक, ॲ. मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.